1

॥ वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभः । निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥

2

जन्मो-जन्मीचा जोडा होईल लग्नाचा साखरपुडा । वर-वधु शोभेल जोडा ।
सोनियाचा टिळा लावुनी, भरला हिरवा चुडा । मंडपी करूनी सोहळा सर्व होऊन गोळा ।
वर घालीत वधु हीस पुष्पमाला । आप्त ईष्ट मंडळी होतील गोळा ।
येऊनी या आशिर्वाद वधु-वरा कर जोहुनी विनंती आपणाला ।

3

चैतन्याने बहरलेल्या प्राप्तकाली तृणपुष्पावर पडलेल्या दवबिंदूप्रमाणे चमकणारे सोनेरी बंधनाचे अनमोल क्षण
आपल्या सान्निध्यात टिपावत, आपल्या स्नेहाने नि आगमनाने लग्नोत्सव अलंकृत व्हावा, हीच मनोकामना

4

एक सकाळ आनंदाची तसेच ऋणानुबंधाची, साथ अविस्मरणीय क्षणांची
चैतन्याला साक्षात्काराची, साथ सनईच्या मंजुळ स्वरांची, शुभ अक्षतांच्या आशीर्वादाची
मंगलष्टकांच्या सुरांनी भारावलेले क्षण, अशा शुभ मंगल प्रसंगी आपले आगमन प्रार्थनीय आहे.

5

सनई चौघड्याच्या निनादात मंगलमय घोषात अक्षतारूपी आशीर्वादाने मंगलमयी शुभेच्छात,
नवसंसाराची वाटचाल करण्यास निघालेले नवदांपत्य विवाहबद्ध होत आहेत,
आपली माया आपल्या आगमनाने वृद्धींगत करावी हे अगत्याचे निमंत्रण.

6

विवाह जीवनातील एक अनमोल क्षण, दोन घराण्यातील ऋणानंबंधाची सुरूवात आपल्या मायेने,
ममतेने ओथंबलेल्या..... ह्रदयाच्या गाभाऱ्यातून उत्स्फुर्तपणे निघालेल्या.....
आपल्या अक्षतासम शुभाशीर्वादाने व्हावे... म्हणून हे आग्रहाचे निमंत्रण.

7

विवाह एक मंगल क्षण, जीवनातील एक अविस्मरणीय घटना, सनईच्या मंजुळ निनादात,
पवित्र व अर्थपुर्ण मंत्रोच्चारात मित्र परिवार, आप्तस्वकीयांच्या साक्षीने चिरकाल चिरकाल नोंदवला जाणारा,
स्मृती गोड असा हा आनंद सोहळा.

8

मेंदी रेखिली पाऊले नव्या जीवनी प्रवेश सुखी भावी आयुष्यात लाभो तुमचे आशिष

9

प्रारंभ एका गोड बंधनाचा, प्रारंभ दोन जिवांच्या मिलनाचा, प्रारंभ एका सभ्यतेचा, एका परंपरेचा प्रारंभ एका त्यागाचा,
एका निष्ठेचा प्रारंभ आयुष्याच्या बेरीज वजाबाकीचा, प्रारंभ एका गोड बंधनाचा एका हर्षोल्हासाचा,
प्रारंभ एका नव्या जिवनाचा यांच गोड प्रारंभाला आपण सर्वांच्या शुभेच्छा व आशिर्वाद लाभावे हिच गोड इच्छा.

10

आकाशाला शोभा ताऱ्यांची, झाडाला शोभा फुलांची, मंडपाला शोभा पाहुण्यांची,
यावे विवाह सोहळ्याला हि विनंती लांडगे पाटील परिवाराची ॥

11

पाऊस क्षणाचा पण गारवा कायमचा । भेट क्षणाची पण मैत्री दोन जिवांची ॥
मुहूर्त क्षणाचा पण नाती आयुष्याची । आपला सहभाग ही क्षणाचा पण आशिर्वाद कायमचा ॥

12

सोनियाच्या पावलाने, मेहंदीच्या हाताने व मधुर संगीताच्या साथीने, कुलदेवतेच्या साक्षीने व माता-पित्याच्या आशिर्वादाने,
सप्तपदीच्या बंधनाने एकमेकांना आजन्म साथ देण्यास निघालेल्या नवदाम्पत्यास शुभाशिर्वाद देण्यासाठी
आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे हि विनंती.

13

विवाह म्हणजे एक अविस्मरणीय क्षण या मंगलप्रसंगी दोन मन, दोन कुटूंब प्रेमरूपी धाग्यानी नातेरूपी वस्त्र विणत
आहेत. या शुभप्रसंगी आपण सह कुटूंब सह परिवार ईष्ट मित्रासह उपस्थित राहून वधू-वरास शुभाशिर्वाद द्यावे.

14

विवाह म्हणजे दोन जीवांचे मिलन, सनई चौघड्यांच्या मंजूळ स्वरात नवजीवनात केलेले पदार्पण,
सुखस्वप्नांच्या पाकळ्यांचे नाजुक उन्मीलन, सासर माहेरच्या नात्याची मंगळसुत्रात केलेली गुफंन,
यासाठी हवा शुभाशिर्वाद व शुभेच्छांनी सुखद रम्य पाखरण, म्हणूनच या शुभविवाहाचे आग्रहांचे व अगत्याचे निमंत्रण.

15

॥ होतील कष्ट तरी यावे लग्नाला । चुकून सांगू नका पत्रिका नव्हती आम्हाला ॥

16

आमच्या कौटुंबिक जीवनातील एक आनंद सोहळा, ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि आप्त स्वकियांची उपस्थिती
हेच या सोहळ्याचे रंग, आपल्या सानिध्यात हा आनंदाचा प्रसंग साजरा व्हावा.
वधुवरास शुभाआशीर्वाद देण्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

17

विवाह आयुष्याच्या वेलीवरचे हळुवार पान... म्हटले तर दोन जिवांना जोडणारा प्रेमाचा धागा...
म्हटले तर दोन कुटुंबांना जोडणारा एक स्नेहबंध... सात जन्माच्या गाठी जुळवणारा हा सोहळा...
आपल्या शुभेच्छा आणि आशीर्वादाशिवाय अपूर्णच... म्हणूनच... या मंगल प्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनियच.

18

कुलदेवतेचा कृपाशीर्वाद... वेदमंत्राची पवित्रता... सुमनांचा सुगंध...
आणि दोन घराण्यातील प्रेमाच्या सुमधुर ऋणानुबंधाची सुरुवात...
ब्रम्हसुतामध्ये गाठ बांधली सात जन्माची । पृथ्वीतलावर जोडी शोभते वधु-वराची ॥
पूर्व जन्माची पुण्याई अ-ब घराण्याची । सगे सोयरे येवुनी शोभा वाढवावी मंडपाची ॥
माथ्यावरती पडोत अक्षता तुमच्या आशीर्वादाची...

19

विवाह सोहळा हा जिवनातील अविस्मरणीय क्षण, कौटुंबीक आनंद सोहळ्याची दिपावलीचा ।
सनई चौघड्यांचा संगीतात देव ब्राम्हणांच्या मंत्रोच्चारात ।
आप्तजनांच्या व मित्रांच्या साक्षीने सप्तपदी चालताना डोळ्यात असंख्य आनंदाची स्वप्ने घेवून वैवाहीक जिवनात
पदार्पण करत आहेत. आपण अक्षतारुपी आशीर्वादांचा वर्षाव करण्यासाठी यावे, म्हणून हे आग्रहाचे निमंत्रण ।

20

निळ्या निळ्या आभाळात चांदण्याचा आरास, प्रत्येकाचा आशिर्वाद लाभावा या क्षणास...

21

चैतन्याच्या चांदण्याला कर्तृत्वाचा सुगंध हवा । मंगल परिणयाचा सोहळा आपल्या साक्षीने व्हावा ॥

22

सोबत यांची सात जन्माची बहरेल बाग संसाराची । यावे विवाह सोहळ्याला विनंती ही अनंतवाड परिवाराची ॥

23

ऋणानुबंध ठावूक नव्हते । एकमेका शोधत होते । आगमण झाले शुभयोगाचे । नाते जुळले दोन मनाचे ।
असे बंधन रेशमाचे अथांग सागर संसाराचा । विवाह होतय वर आणि वधु यांचा,
आशिर्वाद असो कुलदेवतांचा व आपणा सर्वांचा.

24

मित्ती माघ कृष्ण पक्ष 12 शके 1937, रविवार, दि. 6.3.2016 रोजी दुपारी 1238ः वा. या शुभमुहूर्तावर
करण्याचे योजिले आहे. नवदाम्पत्यास शुभाशिर्वाद देण्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे हि नम्र विनंती.

26

सोबत यांची शतजन्माची, बहरेल बाग संसाराची । यावे विवाह सोहळ्याला हि विनंती मळभगे परिवाराची ॥

27

केळीची कमान दारावर झुलणार, सनईच्या साक्षीने चौघडा बोलणार...
हळद हळूच होणार ओली, अलगद झुलणार बाशिंग भाळी...
सावधान म्हणता अक्षता पडणार कुंकावरती नाव उमटणार,
नाते जुळते दोन मनांचे असे हे बंध रेशमाचे अथांग सागर हा संसाराचा
विवाह होतो वधु आणि वर यांचा !
म्हणूनच आपलेपणाचे आमंत्रण आमचे आपुलकीचे आगमन तुमचे...